**महाराष्ट्र शासन**

**नमुना सात**

## महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप आदेश, १९६६ या अन्वये व मुंबई शिधावाटपक्षेत्र अनुसूचित वस्तूंचे (वाटप व नियमन) आदेश, १९८६ चे खंड ३ अन्वये दिलेले प्राधिकारपत्र

(आदेशाच्या खंड ३ अन्वये)

(हस्तांतरित केल्यास, रद्द होण्यास पात्र असेल)

**किरकोळ विक्रेत्यांकरिता**

शिधावाटप नियंत्रक,
महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय.
शिधावाटप क्षेत्र : *..............................
दिनांक ........................................

(अ) प्राधिकारपत्र

प्राधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ..........................................................................................

प्राधिकृत शिधावाटप दुकानाचे नाव ..........................................................................................

प्राधिकृत शिधावाटप दुकानाचा पत्ता ..........................................................................................

प्रभारी विक्रेत्याचे नाव ..........................................................................................................

(पेढी, सहकारी संस्था किंवा कंपनी किंवा मालकाचे दुकान असल्याच्या बाबतीत) मालकाचे नाव किवा भागीदारांची नावे किंवा सचिवाचे किंवा व्यवस्थापकाचे नाव—

१. श्री. ..........................................................................................................

२. श्री. ..........................................................................................................

३. श्री. ..........................................................................................................

४. श्री. ..........................................................................................................

विक्रेत्यास, ज्या जागेत शिधानियंत्रित वस्तूंचा साठा करण्यास किंवा ते साठविण्यास परवानगी दिलेली आहे त्या जागेचा, कोणतीही असल्यास,

पत्ता ..........................................................................................................

..........................................................................................................

लोकांना नियंत्रित दराने ज्या नियम वाटपांतर्गत वस्तू पुरविण्याचा शासनाचा इरादा आहे किंवा ज्या नियम वाटपांतर्गत वस्तू शासन लोकांना नियंत्रित दराने पुरविते, त्या नियत वाटपांतर्गत वस्तूंची खरेदी, वितरण व विक्री या प्रयोजनांकरिता, उक्त किरकोळ विक्रेत्यास याद्वारे प्राधिकृत किरकोळ विक्रेता म्हणून मान्य करण्यात आले आहे.

२. हे प्राधिकारपत्र ज्या वर्षी दिले असेल त्या वर्षाच्या ३१ डिसेंबरपर्यंत ते वैध असेल व त्याच्या वैधतेमध्ये वेळोवेळी वाढ करता येईल.

३. आदेशाच्या किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही विनियमांच्या उपबंधानुसार असे प्राधिकारपत्र वैध असतानाच्या कालावधीत त्यात सुधारण करता येईल, ते निर्लंबित करता येईल किंवा रद्द करता येईल.

(शा.म.मु.) आर १२५० (५००—३-१५)

४. हे प्राधिकारपत्र दुकानाच्या ठळक जागी लावण्यात आले पाहिजे आणि शासनाच्या प्रधिकृत अधिकाऱ्यांकडून तपासणीसाठी मागण्यात येईल तेव्हा ते दाखविले पाहिजे.

५. हे प्राधिकारपत्र त्यात निर्दिष्ट केलेल्या कालावधीपर्यंत वैध असेल. हे प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या इसमाने प्राधिकारपत्राच्या वैधतेचा कालावधी संपण्यापूर्वी शिधावाटप नियंत्रक, *........................................................ यांजकडून त्याच्या मुदतीत योग्य वेळी वाढ करून घेतली पाहिजे.

६. हे प्राधिकारपत्र हस्तांतरित करता येणार नाही.

७. प्राधिकारपत्र पेढीच्या नावाने असेल किंवा पेढीच्या नावाने होणार असेल तर, पेढीचे नाव, पेढीच्या कामाची जागा किवा कामाच्या जागा आणि प्रत्येक भागीदाराचे नाव व राहण्याचा पत्ता शिधावाटप नियंत्रकास पुरविण्यात आला पाहिजे आणि पेढीच्या नावात, कामाच्या जागेत किंवा भागीदारांच्या पत्त्यात जेव्हा जेव्हा कोणताही बदल होईल तेव्हा तेव्हा अशा बदलची लेखी सूचना बदल झाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत नियंत्रकास दिली पाहिजे. †"जर नवीन भागीदार दाखल करून घ्यावयाचा असेल किंवा भागीदारांपैकी कोणीही निवृत होऊ इच्छील तर त्याची पूर्वसूचना नियंत्रकास दिली पाहिजे. जर कोणत्याही नवीन भागीदारास दाखल करून घेण्यात आले असेल किंवा भागीदारांपैकी कोणीही निवर्तला असेल त्यास काढून टाकले असेल तर किंवा अन्यथा भागीदार असण्याचे बंद झाला असेल, तर ज्या तारखेस नवीन भागीदार दाखल करून असेल, किंवा कोणताही विद्यमान भागीदार, भागीदार असण्याचे बंद झाले असेल त्या तारखेपासून सात दिवसांच्या आत त्याची सूचनासुध्दा नियंत्रकास देण्यात आली पाहिजे. अशी कोणताही सूचना मिळाल्यावर किंवा स्वाधीकारी, आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर राज्य शासनाने किंवा शिधावाटप नियंत्रकाने एक तर प्राधिकारपत्र चालू ठेवणे किंवा बाजू मांडण्यास संधी दिल्यानंतर भागीदारी संस्थेच्या रचनेत बदल झाल्याने ती भागीदारी संस्था प्राधिकारपत्र धारण करण्यास यबय नाही असे राज्य शासनाचे किंवा शिधावाटप नियंत्रकाचे मत होत असेल तर ते (प्राधिकरपत्र) ताबडतोब बंद करणे वैध असेल."

८. ज्या संस्थेसंबंधात हे प्राधिकारपत्र देण्यात आलेले आहे त्या संस्थेचे हस्तांतरण करावयाचे असेल ती पोट-भाड्याने द्यावयाची असेल किंवा ती इतर कोणत्याही इसमाकडून चालविण्यात यावी असा करार करावयाचा असेल तर त्या बाबतीत, हे प्राधिकरपत्र धारण करणाऱ्या इसमाने, ते प्राधिकारपत्र अशा इतर इसमाकडे हस्तांतरित करण्यासाठी शिधावाटप नियंत्रक*.................................................. यांजकडे अर्ज केला पाहिजे. शिधावाटप नियंत्रक प्राधिकारपत्र अशा इसमाकडे हस्तांतरित करण्यास बंद्ध असणार नाही.

९. उक्त किरकोळ विक्रेत्याने शिधावाटपाच्या वस्तूंची खरेदी, विक्री किंवा विक्रीसाठी केलेला साठा यासंबंधात आणि हिशोब ठेवणे, नोंदणी, पुस्तके, विवरण ठेवणे व पावत्या देणे यासंबंधात आणि त्या कोणत्या भाषेत ठेवाव्या यासंबंधात व अशा इतर बार्बीच्या संबंधात त्यास नियंत्रकाकडून देण्यात येईल अशा कोणत्याही निदेशाचे पालन केले पाहिजे.

१०. हे प्राधिकारपत्र धारण करणार इसम आदेशाच्या किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही विनियमांच्या उपबंधाचे किंवा अशा कोणत्याही उपबंधान्वये दिलेल्या कोणत्याही अनुदेशांचे, निदेशांचे किंवा आदेशांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करील, तर तो विभागीय कारवाई किंवा खटल्यास किंवा यथास्थिती या दोन्ही गोर्ष्टीस पात्र ठरेल.

११. उक्त किरकोळ विक्रेता, त्याचा भागीदार, एजंट, नोकर किंवा त्याच्या दुकानात त्याच्या वतीने काम करण्यास मुभा देण्यात आलेली. कोणतीही इतर (अशी) व्यक्ती की जिचा सर्वसाधरणपणे जनतेशी आणि विशेषत: त्याच्या दुकानातील शिधापत्रिकधारकांशी संबंध येत असेल तिचे गिऱ्हाइकांशी वर्तन नम्र, विनयशील असावे आणि तिने गिऱ्हाइकांशी आपले वर्तन सेवाभावी आणि सहाकार्याचे ठेवावे.

दिनांक......................,

शिधावाटप नियंत्रक, महाराष्ट्र शासन.

शिधावाटप क्षेत्र,*................................

दिनांक ........................................

सही ..............................................

| | |
|---|---|
| १. | ४. |
| २. | ५. |
| ३. | ६. |

ह्यांस लागू करण्यात आले

*येथे शिधावाटप क्षेत्रांचे नाव नमूद करावे.

†Amended *vide* Notification, date 2-7-1970.